# जागतिकीकरणाचे राज्यावरील परिणाम

प्रा. डॉ. एस. के. खडसे, सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज
इस्लामपूर. जिल्हा. सांगली.

---

**प्रस्तावना :-**

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकांमध्ये एक महत्वपूर्ण घडामोडी म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रभाव जगातील बहुतेक सर्वच राष्ट्रावर पडलेला आहे. 1985 नंतर जगातील सर्व देशांमध्ये उदारीकरण व जागतिकीकरण ह्या दोन नवीन संकल्पना उदयास आल्या. मात्र यापूर्वीच दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्र संघ, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक त्यानंतर जागतिक व्यापार संघटना इत्यादी आंतरराष्ट्रीय स्तरावर जागतिक संघटना स्थापन करण्यात आल्या. यांचा उद्देश जगातील सर्व देशांनी कोणत्याही अडथळ्याशिवाय परस्पर देवाण-घेवाण किंवा व्यवहार करावेत, यामधूनच जागतिकीकरणाला चालना मिळत गेली. जागतिकीकरणाचा प्रभाव जसा राष्ट्रावर होत आहे तसाच तो सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर सुद्धा होत आहे. मुक्त अर्थव्यवस्था भांडवलशाहीचा विस्तारित अंमल, दळणवळण, संगणक युग आणि विज्ञान-तंत्रज्ञान इत्यादी खांबावर या जागतिकीकरणाचा पाया उभा आहे. यामुळेच आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आणि जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल होत आहेत. भारताचा विचार केल्यास 1991 पासून गेट करारावर सही करून जागतिकीकरणास सुरुवात केली.[1]

**संशोधन पद्धती :-**

सदर विषयावर संशोधन करण्यासाठी व संशोधन पेपर लिखाण करण्यासाठी ऐतिहासिक विश्लेषणात्मक व ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे सदर संशोधन पेपर लिहिण्यासाठी वर्तमानपत्रे मासिके अहवाल विविध संदर्भ ग्रंथ इत्यादी दुय्यम साधनांचा वापर केला.

**जागतिकीकरणाची संकल्पना :-**

जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तूची वस्तूंची किंवा घडामोडींचे जागतिक स्तरावर स्थानांतरनाची प्रक्रिया होय. जागतिकीकरण या संज्ञांचा उपयोग बहुतेक करून आर्थिक जागतिकीकरणाच्या संदर्भात केला जातो. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार, थेट परदेशी गुंतवणूक, भांडवल प्रवाह, आंतरराष्ट्रीय प्रवास आणि विज्ञान तंत्रज्ञान यांच्या प्रसाराच्या माध्यमाने राष्ट्रीय व्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी खुले केले जाते.[२]

देशाची अर्थव्यवस्था खुली करून ती जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडण्याचा प्रयत्न करणे म्हणजे जागतिकीकरण होय. कारण जागतिकीकरणाच्या काळात एखाद्या देशाची अर्थव्यवस्था ही फक्त त्या देशात पुरतीच मर्यादित राहिलेली नाही तर विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जगातील सर्वच राष्ट्रे इतके जवळ आलेली आहेत कि, एका देशाच्या अर्थव्यवस्थेचा इतर देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असतो किंवा जागतिक अर्थव्यवस्थेचा परिणाम एखाद्या देशाच्या अर्थव्यवस्था वर होत असतो. त्यामुळे आज सर्व जगाची अर्थव्यवस्था एकच झाली आहे असे आपणास म्हणता येईल.[3]

जागतिकीकरणाच्या व्याख्या :- जगातील अनेक राजकीय विचारवंताने आणि जागतिक बँकेने जागतिकीकरणाच्या काही प्रमुख व्याख्या केल्या आहेत, त्या पुढील प्रमाणे.

1. दिपक नायर यांच्या मते, जागतिकीकरण म्हणजे राष्ट्रांच्या राजकीय सीमा ओलांडून विस्तारित झालेली आर्थिक क्रिया होय.

2. चार्लस् हील यांच्या मते, जागतिकीकरण म्हणजे अधिक एकात्मता आणि परस्परावलंबन या दिशेने जागतिक अर्थव्यवस्थेत झालेला बदल होय.

3. स्टिक लीड्स यांच्या मते, जागतिकीकरण म्हणजे जगातील व्यक्ती आणि देशाचे दळणवळण, संपर्क, वस्तू व सेवा भांडवल आणि ज्ञान यांच्या देवाण-घेवाणीतील कृत्रिम अडथळे दूर करून एकीकरण करणे होय.

4. जागतिक बँकेच्या मते, जागतिकीकरण म्हणजे उपभोग्य वस्तू सह सर्वच वस्तुवरील आयात निर्बंध हळूहळू रद्द करणे, आयात करांमध्ये कपात करणे आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्यांचे खाजगीकरण करणे होय.

वरील सर्व व्याख्यांचा आढावा घेतल्या नंतर जागतिकीकरण म्हणजे एखाद्या देशाची अर्थव्यवस्था जगाच्या आर्थिक अर्थव्यवस्थेशी संलग्न करणे किंवा एकरूप करणे होय. ही एक व्यापक आर्थिक प्रक्रिया आहे या प्रक्रियेमध्ये जागतिक अर्थव्यवस्थेचे एकात्मीकरण केले जाते. देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेला जोडून त्यानुसार आपल्या अर्थव्यवस्थेत अमुलाग्र बदल केले जातात. जागतिक बँकेने भारतावर जागतिकीकरण उदारीकरण आणि खाजगीकरण स्वीकारण्यासाठी खालील शिफारशी केल्या. या शिफारशी मान्य केल्याशिवाय भारताला कोणतीही मदत मिळणार नाही. त्या शिफारशी आणि अटी पुढील प्रमाणे आहेत.

1. आतापर्यंत शासकीय तसेच सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवलेल्या बँका व म्युच्युअल फंड या क्षेत्रात खासगी भांडवलाला परवानगी देणे.

2. प्रत्येक बँकेला आपल्याकडील एकूण भांडवलापैकी 40% भाग सरकारी कर्जरोख्यांचे घालावा लागतो ती मर्यादा कमी करणे म्हणजे खासगी उद्योगाला या बँकेकडून अधिक कर्ज मिळेल.

3. शेतीसारख्या काही उद्योगाला कर्ज घेताना व्याजाचा दर कमी असावा अशी अट होती, ती काढून टाकावी, त्यामुळे बँकांना अधिकाधिक फायदा होईल व खाजगी उद्योगांना अधिक भांडवल उपलब्ध होईल.

4. रोखे व गुंतवणुकीची इतर साधने यावरील कर कमी करून उद्योगांना अधिक भांडवल उपलब्ध करून द्यावे.

5. भांडवलदारांचे हित जोपासने व भांडवल बाजाराचा विकास साधण्यासाठी त्यांच्यावरील देखभालीसाठी नवे नियम तयार करणे.

या सर्व अटी व शिफारशी जागतिक बँकेने भारताकडून मान्य करून घेतल्या आणि त्या भारत सरकारने मान्य केल्या आहेत.[4]

जागतिकीकरण व उदारीकरणाच्या भारतावरील परिणाम :-

जागतिकीकरण आणि उदारीकरणाचा राज्यावर खालील प्रमाणे परिणाम झालेला दिसून येतो. जागतिकीकरण उदारीकरण जगातील गरीब विकसनशील मागास देशांनी स्वीकारल्यामुळे त्या त्या देशात चांगल्या परिणामापेक्षा वाईट परिणाम झालेले दिसून येतात, जागतिकीकरणाचा परिणाम त्या देशातील गरीब, वंचित, दलित, मुस्लीम, शेतकरी, कामगार, छोटे-छोटे कारागीर,

छोटे व्यापारी, स्त्रिया, लहान मुले, वृद्ध, नोकरदार, बेरोजगार, यांच्यावर सुद्धा खूप मोठा परिणाम झालेला दिसून येतो. **जागतिकीकरणामुळे देशातील सरकारला व स्थानिक सत्ताधारी पक्षाला या कंपन्याकडून मोठे कमिशन मिळत असल्यामुळे परदेशातील बहुराष्ट्रीय कंपन्या आपले जाळे जगभर पसरवत आहेत. सेझच्या नावाखाली** हजारो एकर जमिनी सरकारने डोळे झाकून बहुराष्ट्रीय कंपन्यांना द्यायला सुरुवात केली आहे, सार्वजनिक क्षेत्रातील आणि उद्योगधंद्यातील गुंतवणूक व भाग भांडवल काढून खाजगी तसेच परदेशातील भांडवलदारांना भांडवल गुंतवणूक ही संधी देऊन सार्वजनिक व सरकारी कंपन्यांचे खाजगीकरण केले जात आहे.

जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण यांचे राज्यावर झालेल्या परिणामाचा विचार केल्यास त्यामुळे भारतासहित तिसऱ्या जगातील राज्यावर कोणते परिणाम झालेले आहेत, कोणत्या क्षेत्रावर परिणाम झालेले आहेत, जागतिकीकरणाचे अनुकूल आहे की प्रतिकूल परिणाम झाले आहेत याविषयी सविस्तर मांडणी खालीलप्रमाणे करता येईल.

1. निर्यातीमध्ये वाढ झाली :- भारतासहित तिसऱ्या जगातील देशांचा औद्योगिक विकास कमी झाल्यामुळे त्यांच्या निर्यातीमध्ये अन्नधान्य, इंधन खनिजे व इतर कच्च्या मालाचा समावेश होता. भारताने प्राथमिक उत्पादन चहा, कोळंबी, कापूस, खनिजे, चामडे, अन्नपदार्थ इत्यादी तसेच कपडे हस्तोद्योगातील वस्तू, चामड्याच्या वस्तू, पैलू पाडलेले हिरे यांचा निर्यातीमध्ये समावेश आहे. जागतिक बँकेने या सर्व देशांना कर्जबाजारी ठराविक वस्तूच्या निर्यात वाढीचा सल्ला दिला त्यामुळे सर्व विकसनशील देशांनी प्राथमिक उत्पादनाच्या वस्तूच्या निर्यातीवर भर दिले आणि जागतिकीकरणामुळे निर्यातीला खूप मोठी संधी दिली मिळाले आणि निर्यातीमध्ये वाढ झाली त्यामुळे परकीय चलन तिसऱ्या जगातील मागास व विकसनशील देशांना मिळाले. याशिवाय आपल्या स्थानिक वस्तू जगाच्या बाजारपेठेत विकण्यास संधी मिळाली.

2. परकीय गुंतवणुकीला आमंत्रण :- जागतिकीकरणानंतर आंतरराष्ट्रीय अर्थतज्ञ व आर्थिक विचारवंत यांच्या मतानुसार भारताने कर्जबाजारीतून मुक्त होण्यासाठी आपल्या देशाची अर्थव्यवस्था खुली करून एफ डी आय म्हणजे परकीय गुंतवणुकीला मोठ्या प्रमाणात स्थान दिले पाहिजे. त्यामुळे उत्पादनात विविधता येईल निर्यातीची व्याप्ती वाढेल, यामध्ये औद्योगिक उत्पादनाचा ही समावेश असेल. भारताने ही भूमिका 24 जुलै 1991 च्या औद्योगिक धोरण विषयक भूमिका निवेदनामध्ये घेतली होती. भारतामध्ये जवळ-जवळ आजपर्यंत अनेक मोठ्या उद्योग-धंद्यात आणि सार्वजनिक कंपन्यांमध्ये परकीय गुंतवणूक वाढविलेले आहे. आज तर भारतीय रेल, विमान सेवा सहित संपूर्ण बँकिंग सेक्टर, सेवा सेक्टर इत्यादी क्षेत्रातही परकीय गुंतवणूक केली जात आहे त्यामुळे त्यांचे परिणाम भारतावर भारतामध्ये काय होतील याचा अंदाज भविष्यात दिसून येईल.

3. शेती क्षेत्रावर परिणाम:- भारत हा कृषिप्रधान देश आहे त्यामुळे जागतिकीकरणाचा परिणाम कृषी क्षेत्रावर फार मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. शेतीक्षेत्रातील उत्पादित अन्नधान्य, भाजीपाला, आंबा, केळी, डाळिंब, द्राक्ष, सफरचंद, संत्री, तांदूळ इत्यादी सहित भारतातील फळे व औषधी वनस्पती इत्यादींचे पेटंट मिळाले आहे आणि भारतातील शेतीमाल प्रक्रिया करून व त्यांची निर्यात करुन मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तसेच ज्वारी, तांदूळ, नाचणी, बाजरी, जनावराचे मांस, मासे इत्यादीची ही निर्यात होत असल्यामुळे भारताची अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत झाली आहे. शेतीतील किंवा शेती जोड धंद्यातील उत्पादन

जगाच्या बाजारपेठेत विकण्याची संधी मिळालेले आहे, त्यामुळे जगातील वेगवेगळ्या विकसित देशातील शेतीमध्ये उत्पादित मालाची व प्रक्रियेची माहिती विकसनशील देशातील शेतकऱ्यांना मिळत आहे, त्यामुळे शेतकरी अत्याधुनिक शेती करू लागले आहेत. शेतीक्षेत्रात यंत्रसामुग्रीच्या व तंत्रज्ञानाचा खूप मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. त्यामुळे शेती उत्पादनात खूप मोठ्या प्रमाणात वाढ होत असून त्यातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे.

**4.कामगार वर्गावर परिणाम:-** जागतिकीकरणामुळे स्थानिक कामगारांना परदेशी कंपन्यांमध्ये काम करण्याची संधी मिळाली आहे, त्यामुळे जागतिकीकरणामुळे कामगारांना प्रशिक्षणासाठी अत्याधुनिक कंपन्यांत प्रशासनामध्ये जाण्याची व प्रशिक्षणाची संधी मिळत आहे. तंत्रज्ञानाचे व कौशल्याचे प्रशिक्षण मिळत आहे याशिवाय भारताच्या प्रशासनातील आयएएस, आयपीएस, आयएफएस, आयएमएस व इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी परदेशातील प्रशासनात जावून अत्याधुनिक प्रशिक्षण घेत आहेत. याशिवाय मागास देशातील विशेषता भारतातील बहुराष्ट्रीय कंपनीतील कामगारांना परदेशामध्ये जाऊन अत्याधुनिक स्वरूपाचे व कौशल्याचे प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे प्रशासकीय सुधारणा होण्यास मदत होत आहे.[5]

**जागतिकीकरण खाजगीकरणउदारीकरणाचे राज्यावर झालेले दुष्परिणाम:-** दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील वेगवेगळ्या देशातील चलनाचे दर स्थिर राहावेत ज्यांना आवश्यकता असेल त्यांना आर्थिक पुनर्बांधणी व विकास यासाठी कर्ज मिळावे या दृष्टीने आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेची स्थापना 1944 झाली करण्यात आली. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियम ठरवण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना स्थापन करण्यात यावी अशी विकसनशील देशाची मागणी होती. मात्र विकसित राष्ट्रांनी अमान्य केली परंतु आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेची प्रशुल्क व व्यापार या बाबत GATT करार करण्याचा विकसित राष्ट्रांनी आग्रह धरला होता. आर्थर डंकेल यांनी GATT करार युराग्वे येथे तयार केला. भारताने खुल्या अर्थव्यवस्थेच्या धोरणानुसार गेट करारावर सही केली.

**1. शेती क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम:-** जागतिक बँकेने 1991च्या भारत देशाची आर्थिक निवेदन पत्रकात म्हटले आहे की खतावरील अनुदाने पूर्णपणे बंद करावीत यात पुढे म्हटले आहे की पहिली दोन वर्षे ती खताच्या किमती वार्षिक तीस टक्के दरवाढ करण्यात यावी आणि चौथ्या वर्षापर्यंत ही वाढ 20 टक्के वर आणावी आणि भारतातील अकार्यक्षम खत निर्मिती कारखाने बंद करावेत. यामुळे प्रचंड प्रमाणात खताचे दर वाढले आणि त्याचे दुष्परिणाम शेती क्षेत्रावर खूप मोठ्या प्रमाणात झालेले आहे, आज भारतातील शेती क्षेत्र संकटात आले असून जागतिकीकरणामुळे शेतकरी देशोधडीला लागला आहे.

भारतासारख्या जगातील अनेक विकसनशील देशात शेतीतील उत्पन्न तसे तसे कमी होत आहे, शेतीसाठी जलसिंचनाचे सुविधा अपुरी आहे, पावसाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे शेती जमिनीची धूप वाढत आहे, अवेळी पाऊस पडत आहे, रासायनिक खताच्या व सुधारित बी बियाणे यांच्या वाढत्या किमती, सतत दुष्काळी परिस्थिती, त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे. शेतमालाचे दर पडत आहेत, परदेशी मालाची आयात मोठ्या प्रमाणात होत आहे, त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊन त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येत आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांना सबसिडी अनुदान बंद केलेली आहे, जागतिकीकरणामुळे सर्व सवलती बंद

केल्यामुळे भारतासारख्या देशातील शेती क्षेत्रावर खूप मोठ्या प्रमाणात प्रतिकूल असा परिणाम झाला आहे.

**2. सामाजिक कल्याणाच्या योजनेवर प्रतिकूल परिणाम:-** जागतिकीकरणानंतर राजकोषीय तूट कमी करण्याच्या नावाखाली सरकारी खर्चात तसेच सार्वजनिक कामातील खर्चात मोठ्या प्रमाणावर कपात होत असलेला एक विभाग म्हणजे सामाजिक कल्याण व न्याय विभाग होय. गोरगरीब, दलित, वंचित, आदिवासी, भटक्या जाती जमातीच्या लोकांना अन्न, शिक्षण, आरोग्य, वीज आणि पाणी यासारख्या गरजेच्या गोष्टी स्वस्त आणि परवडणाऱ्या किमतीत मिळाव्यात ह्यासाठी सरकारकडून देण्यात येणारी अनुदाने जागतिकीकरणानंतर भांडवलदार व भांडवली राज्यकर्ते जगातील सर्व देशात आपल्याला नफा मिळाला पाहिजेत, यासाठी गरिबांना देण्यात येणाऱ्या सवलती बंद करा, त्यांची अनुदाने बंद करा, त्यांच्यावरील कर वाढवा, त्यांना मिळणाऱ्या सोयी सवलती टप्प्याटप्प्याने बंद करा. आणि महत्त्वाचे म्हणजे श्रीमंतांना उद्योगपती भांडवलदार, कारखानदारांना मोठ्या प्रमाणात सवलती द्या, त्यांचे कर्ज माफ करा, त्यांना मोठ्या प्रमाणामध्ये भांडवल उपलब्ध करून द्या, त्यांना अनुदाने द्या, त्यांना कारखान्यासाठी परवाने तात्काळ द्या, त्यांच्यावरील सर्व कर्ज माफ करा, त्यांच्याकडून घेतलेल्या कर्जावर त्यांना जास्त व्याज परतावा द्या अशा प्रकारचे धोरण सरकार राबवत आहे. **त्यामुळे भारतातील दलित वंचित बहुजन भटक्या जाती जमाती आदिवासी छोटी शेतकरी छोटी व्यापारी आणि कामगार बेरोजगार यांच्यावर जागतिकीकरणाचा परिणाम फार मोठ्या प्रमाणावर झालेला आहे**

**3. शिक्षण क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम :-** बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो ते प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. मात्र सुरुवातीपासून मनुस्मृतीने शिक्षणाची दारे बहुजनांसाठी, शूद्र व अतिशूद्र यांच्यासाठी बंद केलेली होती आणि स्वातंत्र्यानंतर प्रस्थापित भांडवलदार जमीनदार लोक राज्यकर्ते बनले. त्यामुळे ते सत्ताधारी स्वार्थी, आत्मकेंद्री आणि दूरदर्शी नसलेले होते. त्यांनी राजकारणात मोठी आश्वासने दिली, विकासाची स्वप्ने गरीब आणि मागासलेल्या जाती-जमातींना दाखविले, समाजवादाच्या मोठ्या मोठ्या गप्पा मारल्या, परंतु प्रत्यक्षात त्यांनी अनुसूचित जाती-जमाती, भटक्या जाती जमाती, इतर मागास जाती व अल्पसंख्यांक यांच्या विकासासाठी प्रामाणिकपणे आजपर्यंत प्रयत्न केलेला दिसत नाही. 1991 नंतर आर्थिक सुधारणा केल्यानंतर जागतिक बँकेच्या शिफारशीनुसार सार्वजनिक व कल्याणकारी योजनेवरील खर्चात आणखी कपात केली.शिक्षणावरील खर्चात मोठ्या प्रमाणात कपात केली जात आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सरकारने जीडीपीच्या किमान सहा टक्के शिक्षणावर खर्च केला पाहिजे परंतु 1992 मध्ये 3.6 टक्के तर 1996-97 मध्ये 3.4 टक्के आणि आज आपण विचार केला फक्त 3 टक्के केंद्र सरकार शिक्षण क्षेत्रावर खर्च करीत आहे. आज तर सरकारने शाळा-कॉलेज, वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवसायिक कॉलेज मागील त्या धनवान श्रीमंतांना, उद्योगपतींना, राज्यकर्त्यांना विनाअनुदानित तत्त्वावर देण्यास सुरुवात केली आहे तर सन 2000 नंतर कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्वावर शिक्षण संस्था वाटण्यात आल्या. यापुढेही आता खाजगी स्वयंअर्थसहाय्यित शाळा, कॉलेज, खासगी विद्यापीठ, इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करण्याचे कटकारस्थान सरकार करीत आहे. या शाळेत, कॉलेजमध्ये व विद्यापीठात हजारो लाखो रुपये प्रवेश फी आकारली जात आहे. त्यामुळे गरीब, दलित, अल्पसंख्यांक, भटक्या जाती

जमातीच्या मुलांना शिक्षण घेणे अवघड झाले आहे. आज जागतिकीकरणामुळे शिक्षण खाजगी सुरू केल्यामुळे याचा फार मोठा दूरगामी स्वरूपाचा समाजावर परिणाम झालेला आहे.

**5. कामगार वर्गावर परिणाम:-** जागतिकीकरण आणि उदारीकरण आणि खासगीकरणामुळे सार्वजनिक उद्योगधंद्यातील गुंतवणूक कमी केली गेली. काही सार्वजनिक कारखाने उद्योग विकले गेले त्यामुळे भारतामध्ये 150 सार्वजनिक उद्योगातील एक लाखांहून अधिक कामगार बेकार झाले तर आज हजारो कामगारांवर उपासमारीची आणि बेकारीची वेळेत आहे तसेच परकीय उत्पादनाची चालू असलेल्या स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर आपल्या वस्तूची गुणवत्ता वाढवावी लागेल व तिचे उत्पादन खर्च कमी करावा लागेल या दोन्ही बाबीचा कामगारावर परिणाम होणार आहे झाला आहे. जागतिकीकरणामुळे अत्याधुनिक कारखाने साधनसामुग्री व तंत्रज्ञान आल्यामुळे आले त्यामुळे कामगार कपात मोठ्या प्रमाणात होत आहे. त्याचाच परिणाम म्हणून कामगार देशोधडीला लागून बेकार झाले आहेत. तर सार्वजनिक व सरकारी सेवेत सुद्धा कर्मचाऱ्यांना पेन्शन बंद केलेली आहे.अशाप्रकारे कामगार वर्गावर आणि कामगारांच्या धोरणावर जागतिकीकरणाचा फार मोठा परिणाम झालेला दिसून येतो.

**6. दलित व आदिवासी यांच्यावर परिणाम:-** भारतामध्ये समाजही हिंदू समाजव्यवस्थेने गेल्या हजारो वर्षांपासून अस्पृश्य मानलेल्या अनुसूचित जाती व जमातीच्या म्हणजे चातुर्वर्ण्य वस्त्यांमधील शूद्र अतिशूद्र अस्पृश्य या लोकांना कोणते अधिकार दिलेले नव्हते, विकासाची कोणती साधने लोकांना दिलेली नव्हती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या जातींना जागृत केले, त्यांचे प्रबोधन करून त्यांच्या न्याय आणि हक्कासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी लढाई करण्यास प्रवृत्त केले आणि भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून अस्पृश्यता नष्ट करून कलम 17 नुसार अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा आहे, त्याच्यामध्ये शिक्षेची तरतूद केली आणि शासकीय क्षेत्रात अनुसूचित जाती व जमातीसाठी तसेच भटक्या जाती जमाती आणि इतर मागास प्रवर्गातील वर्गासाठी राखीव जागांची तरतूद केली. कुठेतरी नुकतीच त्यांना आपल्या विकासाची संधी मिळाली. तोपर्यंत खाजगीकरण उदारीकरण सरकारने स्वीकारले. जागतिकीकरण उदारीकरण तसेच खाजगीकरणानंतर शासकीय उद्योगधंद्याचे खाजगीकरण सुरू झाले त्यामुळे खाजगी व्यवस्थापनात, खाजगी कारखाने कंपन्यांमध्ये अनुसूचित जाती जमाती साठी भटक्या आणि इतर मागासलेल्या जातीसाठी राखीव ठेवलेल्या जागा कमी झाल्या. यामध्ये कोणते आरक्षणाची तरतूद नसल्यामुळे दलित समाजातील अनुसूचीत जाती जमाती आणि ओबीसी भटक्या जाती जमातीच्या प्रवर्गातील सुशिक्षित युवक बेरोजगार झाले. सामाजिक न्याय व समाजकल्याण खात्याच्या योजनांना कात्री लावली. दलितांची आदिवासींची लाखो युवक बेरोजगार झालेले आहे. जागतिकीकरणामुळे आणि उदारीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या जंगले ताब्यात घेत आहेत, आदिवासी वाऱ्यावर पडले आहे. त्याविरुद्ध आंदोलन करीत आहेत तेव्हा सरकार त्यांना नक्षलवादी ठरवून त्यांना ठार करीत आहे.[6] त्यामुळे जागतिकीकरणाचा परिणाम हा अनुसूचित जातीच्या, ओबीसी अल्पसंख्यांक आणि भटक्या जाती जमातीचे विकासावर देखील फार मोठा परिणाम झालेला आहे.

**7. पर्यावरणावर परिणाम:-** जागतिकीकरणामुळे विकासाचे प्रारूप जगाने स्वीकारले आहे त्याचे पर्यावरणावर दुष्परिणाम होणार आहेत. शासनाने नद्या, डोंगर, घाट, ताब्यात घेतले आणि ते परदेशातील बहुराष्ट्रीय कंपन्या, उद्योगपतीचे मोठे मोठे प्रकल्प कारखाने उभे केले. या ठिकाणी

**असलेले प्राणी, पक्षी, झाडे, वनस्पती औषधी वनस्पती यांचे प्रचंड नुकसान झाले. त्यामुळे निसर्गातील जैवविविधता नष्ट झाली पूर्वी जंगलावर आसपासच्या लोकांची उपजीविका भागवत असं असे, आज या लोकांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. मोठे प्रकल्प आणि बेसुमार वृक्षतोड केल्यामुळे प्रदूषणाची समस्या प्रचंड मोठी निर्माण झाल्यामुळे जगातील पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. त्यामुळे जगातील तापमान वाढ (ग्लोबल वार्मिंग) ही समस्या निर्माण झाली आहे. अशाप्रकारे जागतिकीकरणामुळे पर्यावरणाची हानी फार मोठ्या प्रमाणात होत आहे आता पर्यावरण वाचवा ही मोहीम आता जगभर सुरू झालेली आहे.**

**समारोप :-**

**अशाप्रकारे जागतिकीकरण खाजगीकरण आणि उदारीकरण जगातील अनेक मागासलेल्या व विकसनशील राष्ट्राने तसेच भारताने स्वीकारल्यानंतर त्याचे फार मोठ्या प्रमाणात दूरगामी परिणाम राज्यावर आणि सरकारवर होत आहेत. मग शेती क्षेत्र असो, उद्योग क्षेत्र असो, की कामगार क्षेत्र असो, तसेच भारतामध्ये दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक, भूमिहीन, स्त्रिया असो, शिक्षण क्षेत्र असो, सामाजिक कल्याण क्षेत्र असो इतर पर्यावरण असो इतर कोणतेही क्षेत्र असो या सर्व क्षेत्रावर फार मोठ्या प्रमाणामध्ये दुष्परिणाम झालेले आहे त्यामुळे जगातील मानवी जीवन सुद्धा धोक्यात आलेले आहे आपल्या देशातील नागरिकांच्या हिताच्या आरोग्याच्या शिक्षणाच्या आणि शेतकऱ्यांच्या लोकांच्या विरोधात जाऊन सुद्धा जागतिकीकरण स्वीकारले आहे हे त्या देशापुढील फार मोठे संकट असल्याचे आपल्याला दिसून येते.**

**संदर्भ ग्रंथ सूची.**

1. **जैन मिरज, 'जागतिकीकरण की नवी गुलामगिरी'. लोकायत प्रकाशन**
2. **पंडित नलिनी, 'जागतिकीकरण आणि भारत', लोकवाङ्मय गृह प्रकाशन**
3. **पाटील एकनाथ, (संपा) 'जागतिकीकरण आणि वर्तमान आव्हाने' प्राचार्य विश्वास सायनाकर गौरव अंक, नाग नालंदा प्रकाशन, इस्लामपूर.**
4. **डॉ. तेलतुंबडे आनंद, 'सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण', लोकवाङ्मय गृह प्रकाशन**
5. **डॉ. चव्हाण दिलीप, 'साम्राज्यवाद आणि संस्कृती' क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, सातारा**
6. **डॉ. तेलतुंबडे आनंद, 'सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण', लोकवाङ्मय गृह प्रकाशन**